IIP
International Multidisciplinary Research Journal
IIPIMRJ

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# भारतीय कृषी व्यापार आणि शाश्वत विकास

**डॉ. मच्छिंद्र दामाजी वेदपाठक**
सहाय्यक प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
सांगोला महाविद्यालय, सांगोला (महाराष्ट्र)

**Article Info**

***Article History:***
Received: 26th Sep 2025
Accepted: 10th Oct 2025
Published: 25th Oct 2025

***Keywords:***
अन्न सुरक्षितता,
पुरवठा साखळी,
शाश्वत विकास

**ABSTRACT**

जगातील सर्वच देश कृषी वस्तूंच्या निर्यातीमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करीत आहेत.यासाठी देशांतर्गत कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केला जात आहे. परंतु कृषी क्षेत्रात वाढत चाललेल्या आर्थिक गतीविधीमुळे कार्बनडाय ऑक्सइड आणि हरितगृह वायूंचे प्रमाण वाढू लागले आहे. परिणामी जागतिक तापमानात वाढ होऊन कृषी उत्पादनावर नकारात्मक परिणाम होत आहे.त्यामुळे जगात कृषी उत्पादनात वाढ करूनही भुकेलेल्या लोकांचे प्रमाण पाहिजे त्या प्रमाणात कमी झाले नाही. जागतिक भूक निर्देशांक २०२४ नुसार भारताचा १२७ देशामध्ये १०५ वा क्रमांक आहे.जे अत्यंत विरोधाभासाचे चित्र दर्शवीत आहे.कारण अन्नधान्याचे उत्पादन वाढत असताना भारतात उपासमारीत जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे जे नक्कीच शाश्वत विकासाचे लक्षण नाही. त्यात भारतामध्ये अन्नधान्याची नासाडी अधिक प्रमाणात होत आहे.प्रस्तुत संशोधनात अलीकडील कालावधीत जागतिक स्तरावर बदलत चाललेल्या आर्थिक आणि राजकीय वातावरणामुळे कृषी मालाच्या पुरवठ्याच्या साखळीत व्यत्यय निर्माण होत आहे. परिणामी भारतासारख्या विकसनशील आणि इतर मागासलेल्या देशात अन्नधान्याच्या कमतरतेमुळे निर्माण झालेल्या अन्न सुरक्षिततेचा प्रश्नावर प्रकाश टाकलेला आहे. त्याचबरोबर कृषी विकासामुळे पर्यावरणावरती होणाऱ्या परिणामांची आणि कृषी क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या शाश्वत विकासाची चर्चा केली आहे.

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: Oct 09, 2025
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Vedpathak, M. D. (2025). **भारतीय कृषी व्यापार आणि शाश्वत विकास.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), 827–833

**प्रस्तावना:**

वाढत्या लोकसंख्येमुळे जागतिक पातळीवर अन्नधान्याची मागणी वाढत चालली आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर बहुतांश देशांनी कृषी उत्पादनात वाढ करून निर्यातीचे प्रमाण वाढविण्यावर भर दिला. म्हणजेच कृषी व्यापाराचे प्रमाण वाढत चाललेले आहे परंतु याचा समाज, अर्थव्यवस्था आणि पर्यावरण या घटकावरती परिणाम घडून येत आहे. साधारणता कृषी व्यापाराचा कृषीच्या शाश्वत विकासावर होणारा परिणाम हा पूर्णत: व्यापार कसा आणि कोणत्या पद्धतीने केला जातो यावर अवलंबून असतो. जागतिक स्तरावर जमीनीचा पुरवठा स्थिर आहे. परंतु अन्नधान्यासाठी मागणी मात्र प्रचंड प्रमाणात वाढत आहे. यासाठी उपलब्ध जमीनीतून अधिक उत्पादकता आणि उत्पन्न मिळवण्याचा हव्यास प्रचंड प्रमाणात वाढत चालला आहे.या सर्वांचा विकसित देशावर अनुकूल परिणाम होत आहे पण भारतासारख्या विकसनशील आणि इतर मागासलेल्या देशावरती प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसून येते.कारण आर्थिक नफा मिळवण्यासाठी प्रत्येक देशाकडून कृषी वस्तूंच्या निर्यातीच्या प्रमाणात वाढ केली.त्यामानाने देशात आयातही आली. परंतु असे असले तरी अलीकडील कालावधीत जागतिक स्तरावर बदलत चाललेल्या आर्थिक आणि राजकीय वातावरणामुळे प्रचंड तणाव निर्माण झालेला आहे.रशिया-युक्रेन युद्ध , अमेरिका आणि चीनचे व्यापारयुद्ध त्याचबरोबर अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशाने स्वीकारलेल्या संरक्षणवादी भूमिकेने संपूर्ण जगात आर्थिक संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे कृषी मालाच्या पुरवठ्या साखळीत व्यत्यय निर्माण होत आहे. परिणामी विकसनशील आणि इतर मागासलेल्या देशात अन्नधान्याची कमतरता निर्माण होऊन चलन वाढ होत आहे.त्यामुळे अश्या देशात अन्न सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनत आहे. भुकबळीचे प्रमाण कमी होताना दिसून येत नाही.म्हणजे याला आपण शाश्वत कृषी विकास म्हणावा का हा कळीचा मुद्दा आहे.

सन १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर प्रथमच कृषी मालाला खुली आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळाली. परंतु हे सर्व होत असताना कृषी क्षेत्राला दिले जाणारे अनुदान मात्र कमी करून निर्बंधे हटवण्यावरती भर देण्यात आला. त्यामुळे कृषी क्षेत्रातील वस्तूंची जागतिक स्तरावरील निर्यातीच्या प्रमाणात वाढ झाली. परंतु यामुळे मागासलेल्या व विकसनशील देशांमध्ये अन्नसुरक्षिततेच्या समस्येला तोंड द्यावे लागले. कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी पर्यावरणीय घटकावर अतिक्रमण करण्यात आले.पाणी, खते, रसायने, कीटकनाशके यांचा प्रचंड प्रमाणात वापर केल्यामुळे कृषी क्षेत्रातील शाश्वत विकासाच्या संकल्पनेला तडा जात असल्याचे दिसून येत आहे.

‘शाश्वत शेती म्हणजे वर्तमानकालीन पिढींच्या गरजा पूर्ण करीत असताना नैसर्गिक संसाधनांचे जतन करून पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि भविष्यकालीन येणाऱ्या पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी तडजोड न करता केली जाणारी शेती होय’. म्हणजेच कृषी क्षेत्रातून आर्थिक नफा मिळवताना नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे, आरोग्यदायी पर्यावरण आणि सामाजिक समानता या गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे. परंतु वर्तमानात याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे पर्यावरणीय प्रदूषणाचे प्रमाण वाढत चालले आहे. हवामानात दोलायमानता निर्माण होऊन निसर्गाचे ऋतुचक्र बदलत आहे. जागतिक तापमानात वाढ होऊन कृषी उत्पादनात घट होत आहे. भारताची परिस्थिती याहून वेगळी नाही. भारताची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढत चालली आहे.या वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी शासनाने विविध उपाययोजना केल्या.सन १९६७ -६८ मध्ये भारतात हरितक्रांती घडून आली.भरड धान्याच्या उत्पादनात वाढ झाली. परंतु हरितक्रांतीमध्ये प्रचंड प्रमाणात खते, कीटकनाशके आणि रसायनांचा वापर करण्यात आला.यामुळे मानवाबरोबर पर्यावरणावरतीही विपरीत परिणाम होत आहे.

सन १९९५ मध्ये भारत जागतिक व्याऽपार संघटनेचा सदस्य झाला. त्यानंतर भारतीय कृषी मालाला परकीय बाजारपेठ खुली झाली. भारताच्या कृषी वस्तूंच्या निर्यातीमध्ये वाढ झाली.शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ

करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु हे सर्व करत असताना मात्र जागतिक व्यापार संघटनेच्या नियमानुसार भारतीय कृषी क्षेत्राला देण्यात येणाऱ्या अनुदानात घट करावी लागली. सार्वजनिक वितरण प्रणालीवरही मर्यादा आल्या. मोठे शेतकरी श्रीमंत होत गेले तर याउलट सीमांत व लहान शेतकऱ्यांची परिस्थिती हालाखीची बनत गेली. कृषी आदानाच्या किमती प्रचंड प्रमाणात वाढत गेल्या मात्र त्यामानाने कृषी उत्पादकतेत वाढ झाली नाही. एवढेच नव्हे तर कृषी वस्तूंच्या किमान आधारभूत किमती त्या प्रमाणात वाढल्या नाहीत. एकंदरीत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट साध्य करीत असताना कृषी क्षेत्राच्या शाश्वत विकास मार्गातील अडथळे दूर करणे गरजेचे आहे. भारतातील वाढत्या लोकसंख्येचे प्रमाण पाहता अद्यापही लोकांकडून केली जाणारी अन्नधान्याची मागणी व त्या प्रमाणात उत्पादन यामध्ये ताळमेळ दिसून येत नाही. सी. रंगराजन समितीनुसार भारतात सन २०११ -१२ मध्ये दारिद्र्याचे प्रमाण २९ टक्के इतके होते. म्हणजेच या लोकांना मूलभूत गरजांची पूर्तता होत नाही हे यावरून दिसून येते. ज्या देशात दारिद्र्याचे प्रमाण अधिक असते त्या देशातील अशी लोकसंख्या पर्यावरणामध्ये अति हस्तक्षेप करते. विकासाच्या नावाखाली प्रचंड प्रमाणात नैसर्गिक संसाधनांचा वापर करण्यात येतो. यामुळे जैव परिसंस्थेची अतोनात हानी होऊन पर्यावरणाचे प्रदूषण होऊ लागते.

**समस्येचे विधान :**

आज जागतिक स्तरावर कृषी उत्पादन आणि निर्यात वाढत असताना भूक समस्या आणि त्यातून पर्यावरणीय अवनति घडून येत आहे.जगात साधारणत: ८ टक्क्याहुन अधिक लोकसंख्येला भुकेला तोंड द्यावे लागत आहे. विशेष करून आफ्रिका आणि पश्चिम आशिया देशांमध्ये भूक आणि अन्न सुरक्षिततेचे प्रश्न गंभीर बनत आहे.भारताने मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारल्यानंतर कृषी क्षेत्राला निर्यातीची संधी निर्माण झाली. एका बाजूने भारतात अन्नधान्याचे उत्पादन आणि निर्यात वाढत आहे.त्यापासून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न ही मिळत आहे . जागतिक बँकेच्या अहवालानुसार भारतातील दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली आहे. या अहवालानुसार सन २०११-१२ भारतात दारिद्र्याचे प्रमाण २७ टक्के इतके होते ज्यामध्ये सन २०२२-२३ मध्ये कमालीची घट होऊन ५.३ टक्क्यापर्यंत कमी झाले. पण दुसऱ्या बाजूने जागतिक भूक निर्देशांक २०२४ नुसार भारताचा १२७ देशामध्ये १०५ वा क्रमांक आहे.जे अत्यंत विरोधाभासाचे चित्र दर्शवीत आहे.कारण अन्नधान्याचे उत्पादन वाढत असताना भारतात उपासमारीत जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक आहे जे नक्कीच शाश्वत विकासाचे लक्षण नाही.

**संशोधनाचे उद्देश:**

१. कृषी व्यापार आणि शाश्वत कृषी विकास यामधील संबंधाचा अभ्यास करणे.

२. कृषी विकासाचा पर्यावरणावरील परिणामांचा अभ्यास करणे.

३. जागतिक आर्थिक घडामोडी आणि भारतीय कृषी क्षेत्र याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन हे दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे.संशोधनासाठी आवश्यक माहिती ही कृषी मंत्रालय भारत सरकार,विविध जागतिक भूक निर्देशांक ,आंतरराष्ट्रीय ऊर्जा एजन्सी,विविध पुस्तके,नियतकालिके,वर्तमानपत्रे इ.मधून संकलित केलेली आहेत.

**संशोधनाचे विश्लेषण:**

कृषी विकास होत असताना अगदी तळागाळातील समूहालाही याचा लाभ मिळाला पाहिजे तरच सर्वसमावेशक विकास घडून येतो.कृषी व्यापारामध्ये होणाऱ्या वृद्धीचा फायदा वर्तमानकालीन पिढी बरोबर येणाऱ्या भविष्यकालीन पिढीलाही झाला पाहिजे. कारण योग्य पद्धतीने केला जाणार कृषी व्यापार हा केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर भूक ,दारिद्र्य आणि जैवविविधतेचे संरक्षण होत असते. म्हणजेच कृषी व्यापार आणि शाश्वत विकास यामध्ये थेट संबंध आहे.

**तक्ता क्र.१**

**कृषी व्यापार आणि शाश्वत कृषी विकास**

| वर्ष | अन्नधान्य उत्पादन (मिलियन टन ) | अन्नधान्य निर्यात (लाख मेट्रिक टन ) | जागतिक भूक निर्देशांकात भारताचे क्रमांक |
|---|---|---|---|
| २०११ | २४४.४९ | ६९.३८ | १११ |
| २०२१ | ३१५ .६ | २३२.८७ | १०१ |
| २०२२ | ३२९.६ | ३२७.२४ | १०७ |
| २०२३ | ३३२.३ | ३१४.४० | १११ |
| २०२४ | ३५३.९६ | ११७.४० | १०५ |

स्रोत: कृषी मंत्रालय भारत सरकार, विविध जागतिक भूक निर्देशांक

वरील तक्ता क्र.१ भारतातील लोकसंख्या वाढ, अन्नधान्य उत्पादन आणि जागतिक भूक निर्देशांकात भारताची स्थिती दर्शविली आहे. लोकसंख्येच्या बाबतीत आज भारत प्रथम क्रमांकावर आहे. या वाढणाऱ्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा होण्यासाठी सरकारने हरित क्रांतीसारखे अनेक प्रयत्न केले आहेत.अन्नधान्याच्या बाबतीत भारत स्वावलंबी बनला. अगदी भारतात अन्नधान्याचे शिल्लकी साठे निर्माण झाले. जागतिकीकरणानंतर भारतीय कृषी क्षेत्राला जागतिक स्तरावर निर्यातीसाठी दालने खुली झाली. अन्नधान्याच्या निर्यातीत वाढ होत राहिली. परंतु अन्नधान्य उत्पादनात आणि निर्यातीत वाढ होत असताना दुसऱ्या बाजूने भारतात भुकेलेल्या लोकांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सन २०११ मध्ये भारतात अन्नधान्याचे एकूण उत्पादन हे २४४.९ मिलियन टन इतके झाले तर निर्यात ही ६९.३८ लाख मेट्रिक टन इतकी झाली. यामध्ये वाढ होऊन सन २०२४ मध्ये अन्नधान्याचे एकूण उत्पादन हे ३५३.९६ मिलियन टन इतके झाले तर निर्यात ही ११७.४० लाख मेट्रिक टन इतकी झाली.याबरोबरच जागतिक भूक निर्देशांकात भारताच्या क्रमांकात सुधारणा दिसून आली नाही.

**तक्ता क्र.२**

**भारतातील आणि जागतिक स्तरावर कार्बन डाय ऑक्साइडचे($CO_2$) उत्सर्जन(गिगा टन मध्ये )**

| वर्ष | भारत | चीन | युरोपियन संघ | यू एस ए | जपान | जग |
|---|---|---|---|---|---|---|
| २००१ | १ .० | ३.७ | ३.५ | ५.८ | १.२ | २४.९ |
| २०१० | १.७ | ८.८ | ३.३ | ५.२ | १.१ | ३२.६ |
| २०१५ | २.२ | १०.३ | ३.० | ५.० | १.२ | ३४.७ |
| २०२० | २.३ | ११.४ | २.६ | ४.४ | १.० | ३४.५ |
| २०२१ | २.५ | १२.० | २.७ | ४.७ | १.१ | ३६.४ |
| २०२२ | २.७ | १२.० | २.७ | ४.७ | १.० | ३६.८ |
| २०२३ | २.८ | १२.६ | २.५ | ४.६ | १.० | ३७ .२ |
| २०२४ | ३.० | १२.६ | २.४ | ४.५ | १.० | ३७.६ |

स्रोत: www.iea.org

वरील तक्ता क्र.२ मध्ये सन २००१ ते सन २०२४ या कालावधीमधील भारतातील आणि जागतिक स्तरावरील कार्बनडाय ऑक्साइडचे होणारे उत्सर्जन दाखविले आहे. जगात सर्वाधिक $CO_2$ चे उत्सर्जन चीन आणि यू.एस.ए. या देशामध्ये होत आहे. साधारणत: जपान या देशामध्ये $CO_2$ चे उत्सर्जन स्थिर राहिले आहे. भारतात कार्बन

डायऑक्साइडचे उत्सर्जनामध्ये तीव्र गतीने वाढ झाली आहे.सन २००१ ते २०२४ या कालावधीत जगामध्ये $CO_2$चे उत्सर्जन हे २४.९ गिगा टनावरून ३७.६ गिगा टनापर्यंत वाढ झाली.ही वाढ चीन,अमेरिका आणि भारतातील नैसर्गिक आणि कोळशाच्या वाढत्या वापरामुळे घडून आली. भारत आणि चीन यासारख्या देशामध्ये वाढती लोकसंख्या आणि जलद आर्थिक विकासासाठी इंधनाची मागणी आणि वापर सातत्याने वाढत चालला आहे. त्यामुळे $CO_2$ च्या प्रमाणात वाढ होऊन जागतिक तापमान वाढ होत आहे. याचा संपूर्ण सजीवसृष्टीवर अनिष्ठ परिणाम होत आहे. आशा प्रकारचा विकास हा शाश्वत विकास नसून पर्यावरणावरती अनिष्ट परिणाम करणारा विकास आहे. सन २००१ मध्ये कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन हे १ गिगा टन होते. यात वृद्धी होवून सन २०२४ मध्ये ३ गिगा टनपर्यंत कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जनात वाढ झाली.एकंदरीत केवळ जागतिक स्तरावरच नव्हे तर भारतामध्ये ही $CO_2$ चे उत्सर्जन वाढत चाललेले आहे. या $CO_2$ च्या उत्सर्जनात भारतात ऊर्जा क्षेत्र प्रथम क्रमांकावर तर कृषी क्षेत्र द्वितीय स्थानावर आहे. भारतात लोकसंख्या वाढीमुळे अन्न धान्याची मागणी वाढत चालली आहे .त्यामुळे लागवडी खालील जमिनीच्या प्रमाणात वाढ होत आहे. खते,किटकनाशके यांचे वापराचे प्रमाणही वाढले आहे.वातावरणात हरितगृह वायूचे प्रमाण वाढत आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे तापमानात होणारी वाढ होय.या तापमान वाढीमुळे कृषी उत्पादनात घट होत आहे.

**जागतिक घडामोडी आणि अन्नधान्य पुरवठ्याच्या साखळीतील व्यत्यय:**

कोविड १९ परिणाम , रशिया युक्रेन युद्ध ,हवामान बदल आणि दुष्काळ, कृषी निर्यात विषयक धोरणातील वारंवार बदल,निर्यात बंदी यासारख्या घटना अन्नधान्य पुरवठ्याच्या साखळीतील व्यत्यय निर्माण करून जागतिक अन्न सुरक्षिततेला आव्हान देत आहेत.याचा सर्वाधिक परिणाम गरीब आणि असुरक्षित घटकावरती होतो. भारतातील स्थिती पाहिली असता अन्न धान्याची नासाडी ही पुरवठा साखळीतील सर्वात मोठा व्यत्यय आहे. भारतामध्ये अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत आहे. परंतु अन्नधान्याची वाहतूक,साठवणूक आणि वितरणात अनेक समस्या असल्याने अन्न धान्याची मोठ्या प्रमाणात नासाडी पुरवठा साखळीत व्यत्यय निर्माण होतो.

**निष्कर्ष :**

या संशोधनाची पुढील निष्कर्ष आहेत.

१. भारतासह जागतिक स्तरावर $CO_2$च्या प्रमाणात वाढ होत असल्याने याचा पीक वाढीवर अनिष्ट परिणाम होत आहे.

२. सर्वाधिक $CO_2$ उत्सर्जन हे चीन आणि अमेरिका या देशांकडून होत आहे.

३. जागतिक स्तरावर तापमान वाढ होत आहे.

४ . भारतात अन्नधान्याचे उत्पादन आणि निर्यात वाढत असताना उपासमारीत जीवन जगणाऱ्या लोकांचे प्रमाण चिंताजनक आहे.

५ . बदलत चाललेल्या जागतिक स्तरावरील राजकीय आर्थिक घडामोडी मुळे अन्नधान्याच्या पुरवठा साखळीत व्यत्यय निर्माण झाला आहे .

६. भारतात अन्नधान्याची होणारी नासाडीममुळे अन्न सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होत आहे.

**उपाययोजना आणि सारांश:**

जागतिक स्तरावर भारत प्रमुख कृषी निर्यातदारांपैकी एक आहे .त्यामुळे त्याचा पर्यावरणावर लक्षणीय परिणाम होऊन शाश्वततेचे प्रश्न निर्माण होतात. अस्तित्वात असलेले खूप मोठा भूजल साठा सिंचनासाठी वापरले जात असल्याने जलस्रोतांवर ताण वाढत आहे .त्यामुळे भूजल पातळीत घट झाली आहे.याशिवाय खते,कीटकनाशके यांच्या अतिवापरामुळे जमिनीतील सूक्ष्म पोषक घटकांचा नाश होऊन पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे.शेतीचा विकास आणि पर्यावरणीय परिणामांचा परस्पर संबंध आहे. एकमेव भारतीय कृषी क्षेत्र देशातील प्रचंड लोकसंख्येला अन्न पुरवण्याबरोबर गरिबी दूर करण्याची गरज पूर्ण करते. परंतु पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम होतो.कारण $CO_2$ उत्सर्जनात देशात कृषी क्षेत्र द्वितीय स्थानावर आहे. त्याचबरोबर जागतिक स्तरावर अन्न धान्याची निर्यात वृद्धी होत असताना त्याचा प्रत्यक्ष परिणाम शाश्वत विकासावर होत असतो.शेतीमध्ये उत्पादन वृद्धी करत असताना खते,रसायने,आणि किटकनाशके यांचा मर्यादित वापर करून सेंद्रिय शेतीची जोड देणे गरजेचे आहे.जेणेकरून हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी होऊन तापमान वाढही कमी होईल.उपासमारीत जीवन जगणाऱ्या लोकसंख्येला अन्न सुरक्षितता देण्यासाठी भारतातील अन्न धान्याची नासाडी टाळणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी गोदामांच्या सोईसुविधेत,वाहतूक आणि वितरण व्यवस्थेत सुधारणा होणे गरजेचे आहे.शेतकऱ्यांचे हित लक्ष्यात घेऊन त्यानुसार निर्यात धोरणाची मांडणी आणि अमलबजावणी होणे आवश्यक आहे. याबरोबरच किमान आधारभूत किमतीमध्येही कालानुरूप बदल होणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१ . Ashoka K and Bhat B.Jayarama(2025) Sustainable Development of Agriculture in India-Need for Organic Farming,International Journal for Multidisciplinary Research, vol.7 Issue 2

२ . Arpita Mukherjee, Anushka Pal, Ketaki Gaikwad (2024) Sustainable Food Systems and India's 3dTrade Agreements, ICRIER, Policy Brief #25

३ . S. Rajeswari and other (2024) Agricultural Production, Trade Balances and Sustainable Development in India: An Analytical Study, Intelligent Systems, Business, and Innovation Research (pp.111-119)

४ . Yadav Swati and Mahima (2022) Environmental Sustainability and Agribusiness in India, international journal of all research education and

scientific methods vol.10 issue 4

५ . Kumar Anuj, Meena Sonal, Kumar Sunil and Rana Riya (2022) Sustainable agricultural development in India: An overview, International Journal of Agriculture Extension and Social Development Volume 5; Issue 1 Page No. 118-121

६ . Will Martin (2017) Agriculture trade and food security, ADBI Working paper series 664

७ . Datta G. and Nag B. (2024) Indian Economy, 73 edition, S. Chand publishing, U.P.

८ . इटले डी. एस. (२०१७) भारतीय कृषी विकास व शाश्वत शेतीची गरज:एक चिकित्सक अभ्यास ,Review of research .vol.6,issue-4 pp.1-4

९ . Hoda Anwarul and Gulati Ashok (2013) India's Agricultural Trade Policy and Sustainable Development. ICTSD, Issue Paper No. 49

१० . https://www.mospi.gov.in/

११ . https://agriwelfare.gov.in/en/MinistersOffice

१२ . https://www.iea.org/countries/india/emissions

१३ . https://www.globalhungerindex.org/